प्रा . डॉ . आर . डी . भोसले (1193-1196)

# औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे योगदान

**प्रा . डॉ . आर . डी . भोसले**

*अर्थशास्त्र संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड ता . नांदगाव जि . नाशिक*

**प्रस्तावना ः**

आर्थिक विकासामध्ये मूलभूत सुविधाना महत्वाचे स्थान आहे . आर्थिक विकासासाठी ज्या राष्ट्राचा अर्थव्यवस्थेत या मूलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतात त्या देशाचा जलद गतीने विकास झाल्याचे दिसून येते . आर्थिक विकासामध्ये शेती उद्योग व सेवा क्षेत्राला अनन्य साधारण असे महत्व आहे . या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी इ . स . १९९१ पासून भारताने देखील नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला आहे . त्यातून उदारीकरण खाजगीकरण जागतिकरणाचा उगम झालेला आहे . त्यामुळे खाजगी क्षेत्राला पूर्ण स्वायत्ता बहाल करण्यात आली आहे . त्यामुळे आज सर्व देशाचा औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे फार मोठे योगदान आहे असे आपणास म्हणावे लागेल . हे पुढीलप्रमाणे विषद करता येईल .

संशोधनाचे उदिदष्टे ः

१ . अर्थव्यवस्थेमधील अस्थिरता नष्ट करणे .
२ . आर्थिक वहलशी समन्वय प्रस्थापित करणे .
३ . रोजगारप्रधान अर्थव्यवस्था निर्माण करणे .
४ . अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार उत्पादन घेणे .
५ . औद्योगिक आर्थिक विकासाला चालना देणे .
६ . समतोलित आर्थिक विकासाला हातभार लावणे .
७ . दुरदृष्टी ठेवून गुंतवणूकीला चालना देणे .

संशोधनाचे गृहिते ः

१ . सार्वजनिक उद्योगाला प्रोत्साहन मिळाले आहे .
२ . खाजगी उद्योगामुळे आर्थिक व सामाजिक विकासाला मदत झाली आहे .
३ . भांडवल गुंतवणुकीला चालना मिळाली आहे .
४ . मूलभूत पायाभूत सुविधाचा विकास झाला आहे .
५ . खाजगी क्षेत्राचा गुंतवणुकीमुळे अविकसित राष्ट्राचा विकास झाला आहे .
६ . आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित घेण्यास मदत झाली आहे .